# प्रबोधन
## गोरेगाव

## ३६ वा वार्षिक अहवाल

## २००७ - २००८



# प्रबोधन गोरेगाव

प्रबोधन क्रीडाभवन, प्रबोधन क्रीडाभवन मार्ग, सिध्दार्थ नगर, गोरेगाव (प.), मुंबई - ४०० १०४

दुरध्वनी क्र. २८७९७५८० / २८७९७५८९

www.prabodhan.org

संस्था नोंदणी कायदा १८६० अन्वये नोंदवलेली संस्था (Regn.No.Mum.46/72 GB BSD)

मुंबई सार्वजनिक विश्वस्त अधिनियम १९५० अन्वये नोंदवलेली संस्था

(Regn.No.F 2502 Mum.)

आयकर कलम ८०-ग खाली देणग्या करमुक्त

## पदाधिकारी व कार्यकारी मंडळ

२००७-२००८

| | | |
|---|---|---|
| अध्यक्ष | : | डॉ.मनोहर अद्वयानकर एम्.एस्सी. पी.एच.डी |
| उपाध्यक्ष | : | श्री. जगदीश वालावलकर |
| | | श्री. पुष्कराज कोले |

## कार्यकारी मंडळ

| | | |
|---|---|---|
| कार्याध्यक्ष | : | श्री. शशांक कामत |
| प्रमुख कार्यवाह | : | श्री. अनिल देसाई |
| सहकार्यवाह | : | श्री. भूषण काळे |
| | | श्री. रमेश ईस्वलकर |
| खजिनदार | : | श्री. नितीन शिंदे बी.ए. बी.जे. |

## सभासद

| | |
|---|---|
| श्री. विनोद निंबाळकर | श्री. चंद्रकांत देऊलकर |
| श्री. मिलिंद डुंबरे | श्री. प्रसाद भायदे |
| श्री. शरदचंद्र साळवी | श्री. यतिन सामंत |
| श्री. गोविंद येतयेकर | श्री. पद्माकर सावंत |
| श्री. सुनिल कविश्वर | श्री. अरविंद सावंत |

## स्वीकृत सभासद

श्री. सुनिल वेलणकर  श्री. गोविंद गावडे

## सल्लागार समिती

श्री. श्रीनिवास शिरसेकर  ॲड्. विकास रेळे (कायदेशीर सल्लागा

श्री. वसंत तावडे  श्री. विलास देवरूखकर  श्री. गिरीश देसाई

श्री. पांडुरंग पोखरकर  श्री. सुरेश चव्हाण  श्री. महादेव खानोलकर

| अंतर्गत हिशेबतपासनीस | सनदी लेखापाल |
|---|---|
| श्री. मधुकर पाटणकर | श्री. जयंत आपटे कॉमर्स. एफ.सी.ए. |

# प्रबोधन गोरेगाव
## ३६ वी वार्षिक सर्वसाधारण सभा

प्रबोधन गोरेगाव या संस्थेची ३६ वी वार्षिक सर्वसाधारण सभा बुधवार दि. २४ सप्टेंबर २००८ रोजी रात्री ८.०० वा. प्रबोधन क्रीडाभवन, प्रबोधन क्रीडाभवन मार्ग, सिध्दार्थनगर, गोरेगाव (प.), मुंबई . ४०० १०४ येथे आयोजित करण्यात आली आहे. या सभेस सर्व सभासदांनी वेळेवर उपस्थित राहावे, ही विनंती.

**सभेपुढील कामकाज :-**

१. प्रास्ताविक

२. मागील वार्षिक सभेचे इतिवृत्त वाचन व त्यास मंजुरी देणे.

३. २००७-२००८ चा वार्षिक अहवाल, आयव्यय पत्रक व ताळेबंद हिशेब तपासनीसांच्या अहवालासह वाचून मंजूर करणे.

४. नवीन वर्षाकरिता २००८-२००९ घटनेच्या कलम ७ इ प्रमाणे अध्यक्ष (१ जागा) उपाध्यक्ष (२ जागा) व कार्यकारी मंडळावरील निवृत्त झालेल्या ३ सभासदांच्या जागी नवीन सभासदांची निवड करणे (एकूण ६ जागा).

५. नवीन वर्षाकरिता अंतर्गत हिशेबतपासनीस व सरकारमान्य हिशेबतपासनीस यांची नेमणूक करणे.

६. अध्यक्षांच्या अनुमतीने सभेपुढे येणारी कामे.

**कार्यकारी मंडळ**
**प्रबोधन गोरेगाव**

दि. ५ सप्टेंबर २००८
गोरेगाव, मुंबई.

---

१. संस्थेचा जमाखर्च प्रबोधन क्रीडाभवन, प्रबोधन क्रीडाभवन मार्ग, सिध्दार्थनगर, गोरेगाव (प.), मुंबई - ४०० १०४ येथील संस्थेच्या कार्यालयात दि. १६ ते १७ सप्टेंबर २००८ पर्यंत संध्याकाळी ६ ते ७ या वेळेत अवलोकनार्थ ठेवण्यात येईल. कोणत्याही सभासदास त्याबाबतीत काही सूचना करावयाच्या असल्यास त्या दि. २० सप्टेंबर २००८ पूर्वी कार्याध्यक्षांकडे लेखी सादर कराव्यात.

२. गणसंख्येच्या अभावी वरील सभा तहकूब झाल्यास, तहकूब झालेली सभा त्याच ठिकाणी अर्ध्या तासानंतर घेण्यात येईल व अशा सभेस गणसंख्येची आवश्यकता राहणार नाही.

३. निवडणुकीस उभे राहू इच्छिणाऱ्या सभासदांनी आपले अर्ज दि. १७ सप्टेंबर २००८ पर्यंत संस्था कार्यालयात संध्याकाळी ६ ते ७ या वेळेत आणून द्यावेत. अर्जाचा नमुना सोबत दिला आहे.

# उन्हाळी प्रशिक्षण शिबिर

प्रबोधन गोरेगावतर्फे १९९२ पासून उन्हाळी प्रशिक्षण शिबिर हा उपक्रम प्रारंभ करण्यात आला. शालेय तसेच महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना परिक्षानंतरच्या मोसमात निरनिराळ्या क्रीडाप्रकाराचे माफक दरात प्रशिक्षण मिळावे, या उद्दीष्टाने हे शिबिर सुरू करण्यात आले. सुसज्ज व समतोल अशा क्रीडांगणाचा व क्रीडाभवनातील सुविधांचा जास्तीत जास्त उपयोग करण्याच्या विचाराने या शिबिरास प्रारंभ झाला. या शिबिरास मुंबईतील विविध क्रीडा क्षेत्रातील प्रख्यात व तज्ज्ञ प्रशिक्षकांना मार्फत नियमित प्रशिक्षण देण्याचा पायंडा प्रथमच प्रबोधन गोरेगावने पाडला. या शिबिरास मिळणारा प्रतिसाद लक्षात घेऊन संस्थेने दरवर्षी या शिबिरात नवीन-नवीन क्रीडा प्रकारांचा सहभाग करून दिला. संस्थेचे पदाधिकारी तसेच प्रशिक्षक यांच्या मार्गदर्शनाखाली गेली १६ वर्षे हा उपक्रम सुरू आहे.

यंदाच्या १६ व्या उन्हाळी प्रशिक्षण शिबिरात क्रिकेट, मल्लखांब, टेबल टेनिस, कराटे, अॅथलेटिक्स, चित्रकला व बुध्दिबळ अशा विविध कला, क्रीडा प्रकारांचा समावेश करण्यात आला होता. यावर्षी हे शिबिर दि. १७ एप्रिल ते ३१ मे २००७ या कालावधीत आयोजित करण्यात आले होते.

गेल्या तीन वर्षापासून उन्हाळी प्रशिक्षण शिबिराचा एक भाग म्हणून ८ ते १४ वयोगटातील मुलां-मुलींसाठी विनामूल्य बाल-योग प्रशिक्षण शिबिर आयोजित करण्यात येत आहे. यावर्षी १३० विद्यार्थी या शिबिरात सहभागी झाले. त्यांना योग शिक्षिका **श्रीमती नीलिमा रेडकर व श्रीमती अंजली बुरांडे** यांचे मार्गदर्शन लाभले.

शिबिरातील सर्व कला, क्रीडा प्रकारात एकूण ७०० विद्यार्थी सहभागी झाले होते. सर्व सहभागी शिबिरातील प्रशिक्षणार्थींना संस्थेतर्फे प्रमाणपत्रे देण्यात आली. शिबिराच्या समारोपाच्या दिवशी सहभागी झालेल्या विद्यार्थ्यांनी आपल्या कलागुणांची प्रात्यक्षिके उपस्थितांना करून दाखविली. समारोप सोहळ्यात प्रबोधन संस्थेच्या मल्लखांब, खो-खो व अॅथलेटिक्स, कराटे, जलतरण या क्षेत्रातील वर्षभरात चांगली कामगिरी करणाऱ्या खेळाडूंना कै.भाऊ वराडकर स्मरणार्थ असलेल्या पारितोषिकांचे वितरण सिनियर क्रिकेटर्स सी.सी. संस्थेच्या प्रतिनिधींच्या हस्ते करण्यात आले.

# २०-२० क्रिकेट सामने

आयसीसीने प्रथमच आयोजित केलेल्या २०-२० क्रिकेट सामन्याचे विश्वविजेतेपद हिंदुस्थानने पटकाविले. याच प्रकारची २०-२० क्रिकेट सामने संस्थेने मुंबईत प्रथमच प्रबोधन क्रीडाभवनाच्या भव्य पटांगणावर आयोजित केले होते. बेस्ट समितीचे अध्यक्ष संजय पोतनीस यांच्या हस्ते या सामन्यांचे उद्घाटन झाले. या प्रसंगी मुंबई क्रिकेट असोसिएशनचे रवि सावंत, ज्येष्ठ क्रिकेटपटू अजित पै आदी मान्यवर उपस्थित होते. या सामन्यांमध्ये आदीत्य उध्दव ठाकरे यांचीही उपस्थिती लाभली. चार दिवस चाललेल्या या क्रिकेट सामन्यांमध्ये ज्येष्ठ क्रिकेटपटू संजय पाटील, प्रविण आंब्रे, चंद्रकांत पंडीत, डी.वाय.पाटील स्पोर्टस् ॲकॅडमीचे अध्यक्ष डॉ. विजय पाटील, अविनाश सुळे, हेमंत वायंगणकर आदी मान्यवर उपस्थित होते. मुंबई क्रिकेट असोसिएशनच्या सहकार्याने **प्रबोधन २०-२०** चे क्रिकेट सामने यशस्वीरित्या पार पडले. या सामन्यांमध्ये मुंबईचे ८ नामांकित संघ सहभागी झाले होते. यामध्ये प्रामुख्याने न्यु हिंद, शिवाजी पार्क, जिमखाना, डी.वाय.पाटील, पार्की फेने, नॅशनल, सीसीआय, पोलिस जिमखाना, पॅंतलून या संघाने भाग घेतला होता. या संघात माजी कसोटीपटू व रणजीपटू यांचा समावेश होता.



यात प्रामुख्याने अमित दाणी, राजेश सुतार, ॲबी कुरुविला ह्या रणजी व क्रिकेटपटूंनी सहभाग घेतला. अंतिम सामन्यात नॅशनलच्या संघाने २०-२० चा प्रबोधन करंडक जिंकला. उत्कृष्ट खेळाडूचे पारितोषिक दिनेश साळुंखे ह्याला मिळाले. सामनाच्या सांगता समारंभादिवशी कसोटीपटू श्री. दिलीप वेंगसरकर, माधव मंत्री, माधव गोठस्कर, भारतीय क्रिकेट नियमक मंडळाचे मुख्य कार्यकारी अधिकारी प्रो. रत्नाकर शेट्टी, ज्येष्ठ क्रिकेटपटू बापू नाडकर्णी हे उपस्थित होते. विजेत्यांना त्यांच्या हस्ते पारितोषिक देण्यात आले.

या स्पर्धेदरम्यान गोरेगावचे सिनियर क्रिकेट असोसिएशन व प्रबोधनचे पदाधिकारी यांच्या दरम्यान एक प्रदर्शनीय सामना खेळण्यात आला.

# प्रबोधन गोरेगावतर्फे झालेले कार्यक्रम

## मार्गदर्शन शिबिर

प्रबोधन गोरेगाव व सिक्युअर कॉर्पोरेट सर्विसेसतर्फे प्रसिध्द अर्थतज्ञ श्री. चंद्रशेखर टिळक यांचे 'शेअर बाजाराचे अंतरंग, गुंतवणूक व व्यवसाय संधी' या विषयावर विनामूल्य मार्गदर्शन झाले. हा कार्यक्रम ३० नोव्हेंबर २००७ रोजी मसुराश्रम, पांडुरंगवाडी, गोरेगाव (पूर्व), मुंबई येथे तर १ डिसेंबर २००७ रोजी प्रबोधन क्रीडाभवन, सिध्दार्थ नगर, गोरेगाव (प.), मुंबई येथे झाले.

## 'शिवसेना : काल-आज-उद्या'

'शिवसेना : काल-आज-उद्या' या पुस्तकाचे प्रकाशन मा.श्री.बाळासाहेब ठाकरे यांच्या हस्ते बुधवार, दि. २३ जानेवारी, २००८ रोजी झाले व पुस्तकाचा प्रकाशन समारंभ गुरुवार, दि. २४ जानेवारी, २००८ रोजी सायंकाळी ६ वाजता रविंद्र नाट्यमंदिर, प्रभादेवी, मुंबई ४०० ०२५ येथे झाले. पुस्तकाची प्रस्तावना मा. शिवसेनाप्रमुख श्री. बाळासाहेब ठाकरे यांची असून पुस्तकाचे लेखक श्री. मनोहर जोशी व पुस्तकाचे प्रकाशक शिवसेना नेते व आमदार श्री.सुभाष देसाई आहेत. प्रकाशन समारंभासाठी शिवसेना कार्याध्यक्ष श्री. उध्दव ठाकरे, इतिहासकार श्री.बाबासाहेब पुरंदरे, भाजप राष्ट्रीय नेते श्री. गोपीनाथ मुंडे, साहित्यिक डॉ. राम शेवाळकर, कलावंत प्रभाकर पणशीकर आणि निवृत्त न्यायाधीश चंद्रशेखर धर्माधिकारी उपस्थित होते. पुस्तकाची अंदाजे पाने १००० आहेत.

पुस्तकाचा उद्देश :- शिवसेनेची निर्मिती एका विशिष्ट परिस्थितीत झाली. शिवसेनेचा जन्म पक्ष म्हणून झाला नाही तर एक चळवळ म्हणून झाला. महाराष्ट्रातील आणि विशेषतः मुंबईतील मराठी भाषिकांचे ते एक आंदोलन होते. संयुक्त महाराष्ट्राच्या लढ्यानंतर महाराष्ट्रात सर्वात मोठा राजकीय प्रवाह ज्या संघटनेमुळे निर्माण झाला त्या शिवसेनेची वाटचाल, जनतेचे लाभलेले समर्थन आणि मा.शिवसेनाप्रमुखांचे कणखर नेतृत्व लाभल्यामुळें शिवसेनेची चळवळ वाढली. चळवळीतून राजकीय पक्ष उभा राहत गेला ही गोष्ट खरी आहे. जे घडले त्याचे वास्तुनिष्ठ दर्शन, ४२ वर्षांचा इतिहास जसा घडला तसा.

# ३० व्या क्रीडामहोत्सवाचा निकाल (परिशिष्ट - अ)

**प्रबोधन मानचिन्ह** (सर्वोत्कृष्ट संघ) :
मानचिन्ह पुरस्कर्ते - श्री.सुरेश वासुदेव सैतवडेकर
कै.वासुदेव कृष्णाजी सैतवडेकर स्मृतिचिन्ह,
शाळा : महात्मा गांधी विद्यामंदिर, वांद्रे (पूर्व).

**ॲथलेटिक्स स्पर्धा विजेता संघ** :
मानचिन्ह पुरस्कर्ते : श्री.विनोद निंबाळकर
कै.शशिकला सखाराम निंबाळकर स्मृतिप्रित्यर्थ
शाळा : सेंट लॉरेन्स हायस्कूल, कांदिवली (पूर्व)

**ॲथलेटिक्स स्पर्धा उपविजेता संघ** :
मानचिन्ह पुरस्कर्ते : श्री.एस.एन.बाळकृष्ण
कै.एस.एन.सुब्रमणियन् स्मृतिप्रित्यर्थ
शाळा : चिल्ड्रन्स ॲकॅडमी, मालाड.

**कबड्डी मुले विजेता संघ** :
मानचिन्ह पुरस्कर्ते : मेसर्स गणेश टिंबर मार्ट
कै.आसाराम गायकवाड स्मृतिप्रित्यर्थ
शाळा : महात्मा गांधी विद्यामंदिर, वांद्रे (पूर्व).

**कबड्डी मुले उपविजेता संघ** :
मानचिन्ह पुरस्कर्ते : मेसर्स गणेश एक्सपोर्ट, गोरेगाव
शाळा : श्रमिक विद्यालय, जोगेश्वरी (पूर्व).

**कबड्डी मुली विजेता संघ** :
मानचिन्ह पुरस्कर्ते : मे.जे.बी.सावंत इंजिनिअरिंग प्रा.लि.
शाळा : नंदादीप विद्यालय, गोरेगाव.

**कबड्डी मुली उपविजेता संघ** :
मानचिन्ह पुरस्कर्ते : मेसर्स गणेश प्लास्टिक वर्क्स
शाळा : महात्मा गांधी विद्यामंदिर, वांद्रे (पूर्व).

**लॉन टेनिस स्पर्धा विजेता संघ** :
मानचिन्ह पुरस्कर्ते : श्री. व सौ. रामाराव
कै. त्रिशांक रामाराव स्मृतिप्रित्यर्थ
शाळा : हसंराज मोरारजी पब्लिक स्कूल, अंधेरी.

**लॉन टेनिस स्पर्धा उपविजेता संघ** :
मानचिन्ह पुरस्कर्ते : श्री. व सौ. रामाराव
कै. त्रिशांक रामाराव स्मृतिप्रित्यर्थ
शाळा : डिव्हाईन चाईल्ड, अंधेरी.

**खो-खो मुले विजेता संघ** :
मानचिन्ह पुरस्कर्ते : आर.एस.जंगम
शाळा : महात्मा गांधी विद्यामंदिर, वांद्रे (पूर्व)

**खो-खो मुले उपविजेता संघ** :
मानचिन्ह पुरस्कर्ते : मे.तुलसीदास खिमजी वेअर हाऊसिंग कं.
कै. तुलसीदास खिमजी स्मृतिप्रित्यर्थ
शाळा : सुविद्यालय, बोरीवली.

**खो-खो मुली विजेता संघ** :
मानचिन्ह पुरस्कर्ते : कै.एन.बी. पाटील
कै. मंदार पाटील स्मृतिप्रित्यर्थ
शाळा : महात्मा गांधी विद्यामंदिर, वांद्रे (पूर्व)

**खो-खो मुली उपविजेता संघ** :
मानचिन्ह पुरस्कर्ते : सौ.आशा प्रभाकर ठाकूर
शाळा : पार्ले टिळक विद्यालय, विलेपार्ले.

**संचलन स्पर्धा विजेता संघ** :
मानचिन्ह पुरस्कर्ते : कै.एन.बी. पाटील
कै. बाळकृष्ण पाटील स्मृतिप्रित्यर्थ
शाळा : सेंट ॲनी हायस्कूल, बोरीवली (प.)

**संचलन स्पर्धा उपविजेता संघ** :
मानचिन्ह पुरस्कर्ते : मेसर्स गोरेगाव स्पोर्टस् क्लब
शाळा : रूस्तमजी इंटरनॅशनल स्कूल, दहीसर (प.)

**लोकनृत्य स्पर्धा विजेता संघ** :
मानचिन्ह पुरस्कर्ते : मेसर्स हॉटेल प्रकाश, गोरेगाव
शाळा : सेंट पॉल हायस्कूल, मालाड (प.)

**लोकनृत्य स्पर्धा उपविजेता संघ** :
मानचिन्ह पुरस्कर्ते : मेसर्स आशीर्वाद स्टोर्स, गोरेगाव
शाळा : ऑक्सफर्ड पब्लिक स्कूल, कांदिवली (पूर्व)

**मल्लखांब स्पर्धा विजेता संघ** :
मानचिन्ह पुरस्कर्ते : श्री.विनोद निंबाळकर
कै.सखाराम निंबाळकर स्मृतिप्रित्यर्थ
शाळा : महात्मा गांधी विद्यामंदिर, वांद्रे (पूर्व).

# आवाहन

**प्रबोधन गोरेगाव** संस्थेने सुरू केलेल्या रक्तपेढीस आर्थिक सहाय्याची अत्यंत आवश्यकता आहे. आपणास नम्र विनंती आहे की, आपण संस्थेचे हितचिंतक या नात्याने या स्तुत्य उपक्रमासाठी जास्तीत जास्त आर्थिक मदत देऊन संस्थेच्या या सेवाभावी व सामाजिक कार्यास आपलाही हातभार लावावा. रूपये २५,०००/- व त्यापेक्षा जास्त देणगी देणाऱ्या देणगीदारांच्या नावांचा उल्लेख प्रबोधन रक्तपेढीच्या फलकावर कायमस्वरूपी लावण्यात येईल.

**आपण दिलेली देणगी (८० ग) नियमानुसार करमुक्त आहे.**

ज्ञान-कला-सेवा यांचा त्रिवेणी संगम

प्रबोधन
गोरेगाव

**प्रबोधन क्रीडाभवन,** प्रबोधन क्रीडाभवन मार्ग, सिध्दार्थनगर,
गोरेगाव (प.), मुंबई ४०० १०४ दूरध्वनी : २८७९ ७५ ८०/८१
www.prabodhan.org

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सहकार्यातून साकार झालेले
**प्रबोधन क्रीडाभवन**
या सर्वांगसुंदर क्रीडासंकुलामध्ये क्रिकेट, जिम्नॅस्टिक्स, ॲथलेटिक्स, टेबलटेनिस, योग, खो-खो, कराटे व नृत्य यांचे तज्ज्ञांकडून प्रशिक्षण उपलब्ध तसेच सुसज्ज व्यायामशाळा, हेल्थ सेंटर

मुंबई गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळाच्या सहकार्यातून साकार झालेले
**प्रबोधन जॉगर्स पार्क**
टेनिस प्रशिक्षणाची आणि सरावाची सुविधा असलेली टेनिस ॲकॅडेमी आणि सभोवताली सुंदर वनराई असलेला जॉगिंग ट्रॅक

मराठी, इंग्रजी व हिंदी साहित्याने परिपूर्ण
**प्रबोधनकार ठाकरे वाचनालय**
प्रत्येक घरासाठी, घरातील प्रत्येकासाठी उत्तमोत्तम पुस्तके आणि बाळगोपाळांसाठी
ज्ञान - मनोरंजनाचा मेवा

**प्रबोधन जॉगर्स पार्क :** सिध्दार्थनगर, रस्ता क्र. १७, गोरेगाव (प.),
मुंबई - ४०० ०६२. दूरध्वनी : २८७५ ७५ ८८.

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सहकार्यातून साकार झालेली
**सौ. मीनाताई ठाकरे रक्तपेढी**
२४ तास कार्यरत उपलब्ध.
सिध्दार्थ रुग्णालय, गोरेगाव (प.), मुंबई - ४०० १०४. दूरध्वनी क्र. २८७२ ११२१/ २८७२ ५५६६ / ६७

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या सहकार्यातून साकार झालेला
**ओझोन जलतरण तलाव**
**'ओझोन'** प्रक्रियेचा वापर केलेल्या जलतरण तलावात
तज्ज्ञांकडून पोहण्याचे प्रशिक्षण माफक दरात उपलब्ध.
निरलॉन ऑलिम्पिक जलतरण तलाव, सिध्दार्थ नगर, गोरेगाव (प.), मुंबई - ४०० १०४.
दूरध्वनी क्र. २८७९ ७५ ८२/८३